**भाषा संचालनालयातील सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली)/विभागीय सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) या संवर्गांतील अधिकाऱ्यांची दि. ०१.०१.२०१३ ची अंतिम सामायिक ज्येष्ठतासूची.**

**महाराष्ट्र शासन**
**मराठी भाषा विभाग**
**शासन परिपत्रक क्रमांक : भाज्येसू-२०१७/प्र.क्र.१३९/आस्था-२,**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक : २७ फेब्रुवारी, २०१८

वाचा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय, क्रमांक एसआरव्ही-२०११/ प्र.क्र.२८४/१२, दि.२१.१०.२०११.
२) मराठी भाषा विभाग, शासन परिपत्रक, क्रमांक भाज्येसू-२०१७/ प्र.क्र. १३९/आस्था-२, दि. २४.०१.२०१८
३) भाषा संचालनालयाचे पत्र क्रमांक ज्येसूची-२०१७/प्र.क्र.१३१/३२९/ चौदा, दि. १७.०२.२०१८

**शासन परिपत्रक**

वरील संदर्भ (२) अन्वये भाषा संचालनालयातील सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली)/विभागीय सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) या संवर्गांतील अधिकाऱ्यांची दि. ०१.०१.२०१३ ची तात्पुरती सामायिक ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करुन याबाबत संबंधितांचे आक्षेप व सूचना मागविण्यात आल्या होत्या. या तात्पुरत्या ज्येष्ठता सूचीस श्री. अ.वा. गिते, सहायक भाषा संचालक, यांनी त्यांच्या दि. ०६.०२.२०१८ च्या निवेदनाद्वारे आक्षेप नोंदविला असल्याचे संदर्भ (३) अन्वये भाषा संचालकांनी कळविले आहे.

२. श्री. गिते यांनी सदर दि. ०६.०२.२०१८ च्या निवेदनाद्वारे असे नमूद केले आहे की, सहायक भाषा संचालक या पदावरील नियुक्तीच्या अनुषंगाने त्यांच्या दि. ०२.११.२०१५ च्या स्वतंत्र निवेदनाद्वारे उपस्थित केलेल्या मुद्यांच्या अनुषंगाने निर्णय झालेला नसताना किंवा त्याबाबत त्यांना कोणतीही सूचना प्राप्त झालेली नसताना सदर संवर्गाची ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करुन पुढील कार्यवाही करणे न्यायोचित होणार नसून ही बाब त्यांच्यावर अन्यायकारक ठरत आहे. श्री. गिते यांनी त्यांच्या दि. ०२.११.२०१५ च्या निवेदनामध्ये न्यायालयाच्या विविध निर्णयांचे उल्लेख करुन त्या अनुषंगाने सद्य:स्थितीत त्यांच्यावर अन्याय झाला असल्याचे नमूद केले आहे. त्यांच्या सदर निवेदनांमध्ये उल्लेख केलेल्या विविध न्यायनिर्णयांचे संकलन करुन त्या आधारे सदर संवर्गाची

सद्य:स्थिती तपासणे या कामास काही कालावधी लागणार आहे. या दरम्यान सदर संवर्गाच्या पुढील सर्व सेवाविषयक बाबी स्थगित ठेवणे प्रशासकीय दृष्टीने गैरसोयीचे आहे. श्री. गिते यांच्या निवेदनावरील निर्णय/निष्कर्षाअंती सदर बाबींचे पुनर्विलोकन करण्याच्या अधीन सद्य:स्थितीत विचाराधीन असलेली सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली)/विभागीय सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) या संवर्गाची दि. ०१.०१.२०१३ ची सामायिक ज्येष्ठता सूची प्रसिद्ध करणे आवश्यक आहे. त्यामुळे सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली)/विभागीय सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) या संवर्गाची दि. ०१.०१.२०१३ ची अंतिम सामायिक ज्येष्ठता सूची खालील अटींच्या अधीन प्रसिद्ध करण्यात येत आहे.

१) दि. ३१.१२.२०११ पर्यंत सेवानिवृत्त, स्वेच्छा सेवानिवृत्ती, निधन, भाषा उप संचालक पदावरील पदोन्नती नियमित झालेल्या अधिकाऱ्यांची नावे सेवाज्येष्ठता यादीतून वगळण्यात आली आहेत.

२) ज्येष्ठतासूचीतील अधिकाऱ्यांच्या नावासमोर नमूद केलेला ज्येष्ठतेचा दिनांक हा शासन अधिसूचना सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक एसआरव्ही-१०७६/बारा, दि. २१.०६.१९८२ नुसार फक्त सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) संवर्गातील ज्येष्ठता निश्चित करण्याकरिता विचारात घेण्यात येईल. सदर दिनांकाच्या अनुषंगाने आर्थिक लाभ देय ठरणार नाहीत.

३) सदर ज्येष्ठतासूची ही मा. उच्च न्यायालयाने याचिका क्रमांक २७९७/२०१५ वर दिलेल्या न्यायनिर्णयानुसार तसेच यासंदर्भात मा. सर्वोच्च न्यायालयात दाखल केलेल्या विशेष अनुमती याचिका क्रमांक २८३०६/२०१७ वरील अंतिम निर्णयानुसार ज्येष्ठतासूचीमध्ये आवश्यकतेनुसार बदल होईल.

४) सदरहू अंतिम सामायिक ज्येष्ठतासूची मा. महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई येथे दाखल मूळ अर्ज क्रमांक ८६२/२०१६ वरील निर्णयाच्या अनुषंगाने अपेक्षित कार्यवाहीच्या अधीन राहील.

३. सदर शासन परिपत्रक महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आले असून त्याचा संकेतांक २०१८०२२७१३३२१६७३३३ असा आहे. हे परिपत्रक डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

Nanda Maruti Raut

Digitally signed by Nanda Maruti Raut
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Marathi Bhasha Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=281d8ee0076aee3a052a490903f93deadef9f7e2a186620ec03666d244838270, serialNumber=baf9d9317025580944685e047b9c52d64c532684054f19e1f02c374b78e1773f, cn=Nanda Maruti Raut
Date: 2018.02.27 15:42:26 +05'30'

**( नंदा म. राऊत )**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

**प्रति,**

१. भाषा संचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. संबंधित अधिकारी (भाषा संचालनालयामार्फत).
३. निवड नस्ती.

# प्रपत्र “अ”

## सहायक भाषा संचालक (अनुवाद व शब्दावली) या संवर्गाची दिनांक ०१.०१.२०१३ रोजीची ज्येष्ठतानिहाय सामायिक ज्येष्ठतासूची

| अ. क्र. | ज्येष्ठता क्र | नाव | प्रवर्ग(नियुक्ती नंतर प्रवर्ग बदलला असल्यास त्याचा दिनांक) | जन्मतारीख | सहायक भाषा संचालक (अ.व.श.) पदावरील नियुक्तीचा मार्ग(सरळसेवा / पदोन्नती) | सहायक भाषा संचालक(अ.व.श.) पदावरील पदोन्नतीचा नियमित/ज्येष्ठता दिनांक | सेवानिवृत्तीचा दिनांक | शैक्षणिक अर्हता | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ | ५ | ६ | ७ | ८ | ९ | १० |
| १ | १ | श्री.अ.शां.गोसावी | वि.जा.भ.ज (वैधता प्राप्त) | ०६.१०.१९५९ | सरळसेवा | १५.११.१९९० | ३१.१०.२०१७ | एम.ए. (मराठी) | श्री.गोसावी यांना दि.९.७.२०१२ रोजी भाषा उप संचालक (अ.व श.) पदावर नियमित पदोन्नती .<br>श्री.गोसावी हे दि.३१.१०.२०१७ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. |
| २ | २ | श्री.रा.बा.जाधव | अनुसुचित जाती (वैधता प्राप्त) | ०६.०७.१९५७ | पदोन्नती | २२.१०.२००३ | ३१.०७.२०१५ | बी.ए. (मराठी) | श्री.जाधव हे दि.३१.७.२०१५ रोजी सेवानिवृत्त झाले आहेत. |
| ३ | ३ | श्रीमती चे.क.प्रधान | खुला | १२.०८.१९५७ | पदोन्नती | २६.११.२००७ | ३१.०८.२०१५ | एम.ए. (मराठी) | श्रीमती प्रधान या दि.३१.८.२०१५ रोजी सेवानिवृत्त झाल्या आहेत. |
| ४ | ४ | श्री.ल.म.डोनीकर | अनुसुचित जमाती (वैधता प्राप्त) | १०.०१.१९६५ | पदोन्नती | ०१.०४.२०१० | ३१.०१.२०२३ | एम.ए. (मराठी) एलएलबी | श्री.डोनीकर यांना दि.२०.४.२०१५ पासून भाषा उप संचालक (विधी) पदावर तात्पुरती पदोन्नती |
| ५ | ५ | श्रीमती वि.ल.डोनीकर | खुला | २६.०९.१९६७ | सरळसेवा | ०६.०३.२०१२ | ३०.०९.२०२५ | एम.ए. (मराठी) | महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून नियुक्ती. |
| ६ | ६ | श्री.अ.वा.गिते | वि.जा.भ.ज. (वैधता प्राप्त) | ०२.०२.१९६९ | सरळसेवा | ०२.०७.२०१२ | २८.०२.२०२७ | एम.ए. (मराठी) एलएलबी | महाराष्ट्र लोकसेवा आयोग पुरस्कृत उमेदवार म्हणून नियुक्ती. |